CMYK

**आभाळ फाटलं : शेतकऱ्यांच्या स्वप्नावर घाला; तालुक्यातील ४८ हजार ४०६ शेतकऱ्यांना फटका** >> पान 2

**कांचनगंगा नदीच्या पुरामुळे गावात शिरले पाणी; जलजीवन विस्कळीत** >> पान 3

**शेतकऱ्यांचा संयम तुटायची वाट पाहू नका, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जावून तुपकरांचा सरकारला इशारा** >> पान 4

**सुविचार**

आपल्या क्षमता ओळखा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 286 ■ शनिवार, दि. 28 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**कांटा लगा गर्ल अभिनेत्री शेफाली जरीवाला हिचं ४२ व्या वर्षी निधन; मनोरंजन क्षेत्रात हळहळ**

आतील पान

## भाजप मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील १९ कारमध्ये डिझेलऐवजी भरले पाणी; पेट्रोल पंपच सील

**रतलाम :** काही पेट्रोल पंपावर इंधन भरल्यावर वाहनांचा अव्हरेज कमी येतो, अशा तक्रारी अनेकदा केल्या जातात. तर, काहीवेळा पेट्रोल पंपावरील पेट्रोल किंवा डिझेल या पदार्थांमध्ये पाण्याचाही अंश असल्याचे व्हिडिओ यापूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. मात्र, आता चक्क मुख्यमंत्री महोदयांच्या ताफ्यातील इनोव्हा कारमध्येच पेट्रोल पंपावर इंधनाऐवजी पाणी भरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भाजप नेते आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ इनोव्हा कारमध्ये गुरुवारी रात्री डिझेल भरण्यासाठी ढोसी गावातील भारत पेट्रोल पंपावर गेल्या होत्या. मात्र, त्यानंतर काही वेळातच या गाड्या बंद पडल्याने ही घटना उघडकीस आली.

मुख्यमंत्री मोहन यादव यांचा ताफा रतलाम येथे एमपी राईज २०२५ कॉन्क्लेव्हसाठी रवाना झाला होता. त्यामुळे, या ताफ्यातील १९ इनोव्हा कारमध्ये डिझेल भरण्यासाठी ढोसी गावातील पेट्रोल पंपावर त्या कार थांबल्या होत्या. मात्र, येथील पंपावर डिझेल भरल्यानंतर काही वेळातच या कार पुढे जाऊन अचानक बंद पडल्याची घटना घडली. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील कार अचानक बंद पडल्याने प्रशासकीय अधिकारी व पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

# राज ठाकरे-उद्धव ठाकरे एकत्र

# हिंदी सक्तीवरुन भाजपमध्ये नाराजी

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीच्या विरोधात मनसेप्रमुख राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघेही एकत्र आले आहेत. येत्या ५ जुलै रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटी ते आझाद मैदानापर्यंत काढण्यात येणाऱ्या मोर्चात हे दोघेही सहभागी होणार आहेत. राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येत असल्याने मनसे व ठाकरे गट दोन्ही बाजूचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये आनंदाची भावना आहे.**



या पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रवक्ते आणि नवी मुंबई शहराध्यक्ष गजानन काळे यांनी केलेल्या एक पोस्टमुळे खळबळ उडाली आहे. गजानन काळे यांनी हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरुन भाजपच्या अंतर्गत वर्तुळातच प्रचंड खदखद असल्याचा दावा केला आहे.

हिंदी सक्तीच्या विरोधात भाजप पदाधिकाऱ्याने राजीनामा दिला. भारतीय जनता पक्षाच्या लोकांनाही हिंदी सक्तीचा निर्णय मान्य नाही. आता तरी भाजपचे भैय्ये ऐकणार आहेत का? भाजपातील स्वाभिमानी मराठी पदाधिकाऱ्यांना आवाहन ... मोर्चात या..., असे गजानन काळे यांनी एक्सवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. यावर आता भाजपच्या गोटातून काय प्रतिक्रिया येणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

राज ठाकरे यांनी हिंदी सक्ती विरोधात घेतलेल्या भूमिकेला आता शाळांकडून देखील पाठिंबा मिळत आहे. वरळी येथील लिटिल स्टार स्कूलने आज आम्हाला पाठिंबा देत कोणत्याही परिस्थितीत हिंदी सक्ती नको. सहा वर्षाच्या मुलाला हिंदी भाषा शिकताना अडचणी येऊ >> पान २

## राज ठाकरे-उद्धव ठाकरेंनी एकत्र येण्याचा निर्णय घेताच पक्षांच्या केडरमध्येही हालचाली सुरु, दादरमध्ये संदीप देशपांडे- वरुण सरदेसाईंची भेट

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरुन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. ५ जुलै रौजी मुंबईतील गिरगाव चौपाटी ते आझाद मैदानापर्यत काढण्यात येणाऱ्या मोर्चात हे दोन्ही नेते सहभागी होणार आहेत. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी सकाळी सोशल मीडियावरुन यासंदर्भातील घोषणा केली होती. प्रमुख नेत्यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता मनसे आणि ठाकरे गट यांच्या केडरमध्येही एकत्र येण्याच्या हालचाली सुरु आहेत. याचाच एक भाग म्हणून मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि ठाकरे गटाचे नेते वरुण सरदेसाई यांनी शुक्रवारी दादरमध्ये एकमेकांची भेट घेतील.

राज ठाकरे यांच्या शिवाजी पार्कमधील निवासस्थानापासून काही अंतरावरच असलेल्या जिप्सी या रेस्टॉरंटमध्ये संदीप देशपांडे आणि वरुण सरदेसाई यांची भेट झाली. जिप्सी रेस्टॉरंटच्या बाहेरच्या भागात असलेल्या बाकड्यांवर बसून हे दोन्ही नेते गप्पा मारत होते. साहजिकच प्रसारमाध्यमांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. यावेळी त्यांच्याशी संवाद साधला असता वरुण सरदेसाई यांनी म्हटले की, राज ठाकरे यांच्या आवाहनानंतर उद्धव ठाकरे यांनी त्यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. एकाच विषयासाठी दोन मोर्चे काढण्यापेक्षा एकत्रित मोर्चा काढावा, असा निर्णय दोन्ही नेत्यांनी घेतला. हा मोर्चा भव्यदिव्य असला पाहिजे. यासाठी विद्यार्थी, पालक, कलाकार आणि सामान्य नागरिकांना कशाप्रकारे आवाहन करायचे, यासाठी आमची आजची भेट आहे.

## प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासंदर्भात दीर्घकालीन व पर्यावरणपूरक धोरण सादर करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात प्रथा, परंपरांचा मान राखत पर्यावरणाच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेले धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासंदर्भात आज सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ड.आशिष शेलार, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, मुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, बृहन्मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी, प्रधान सचिव व विधी परामर्षी सुवर्णा केवले, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रभारी सदस्य सचिव रविंद्र आंधळे आदी उपस्थित होते.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार राज्य शासनाने राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोगाकडून अहवाल मागविला होता. आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी हा अहवाल दिला असून त्यात काही शिफारसी करण्यात आल्या होत्या. खोल समुद्रात



मोठ्या मूर्तींचे विसर्जन करण्यासंदर्भात अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचा अभ्यास करून न्यायालयासमोर बाजू मांडण्यात यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

तसेच सार्वजनिक गणेश विसर्जनानंतर समुद्रकिनारे स्वच्छ करण्याची काळजी घेण्यासाठी ठोस उपाय आवश्यक आहेत, तसेच गणेशमूर्तीं तयार >> पान २

## मराठीवर अन्याय होता कामा नये ही आमची भावना

### स्थानिक भाषांचे महत्त्व कमी करण्याचे सरकारचे प्रयत्न, पृथ्वीराज चव्हाण यांची टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र आणि राज्य सरकारने शिक्षणावरचा खर्च कमी केला आहे हा मूलभूत मुद्दा आहे. आपण किती भाषा ठेवा पण शिकवायला मूलभूत सामग्री नाही. शिक्षणाची दुर्दशा झाली आहे आणि दुसऱ्या बाजूला भाषेचा मुद्दा काढत आहेत, अशा शब्दात ज्येष्ठ काँग्रेस नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी हल्लाबोल केला आहे. मनसे आणि शिवसेनेच्या वतीने काढल्या जाणाऱ्या मोर्चात सहभागी व्हायचे का नाही याचा निर्णय प्रदेशाध्यक्ष आणि नेते ठरवतील, असेही त्यांनी म्हटले आहे. प्राथमिक शिक्षण असो माध्यमिक शिक्षण असो किंवा उच्च शिक्षण असेल त्यावर प्रचंड मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची गरज असून बाकीचे सर्व निरर्थक वाद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, हिंदी ही राजभाषा आहे. देशाला लिंक लँग्वेज म्हणून हिंदी भाषेचा वापर होतो. इंग्रजी ही ज्ञान भाषा आहे. इंग्रजीमध्ये जेवढं नवीन संशोधन होत आहे ते इतर कोणत्याही भाषेत होत नाही. राज्यकर्त्यांचा जो प्रयत्न सुरू आहे इंग्रजीला बाजूला करा आणि स्थानिक भाषांचे महत्त्व



कमी करा. यासाठी एक एक प्रयत्न चालवले असल्याने हा गदारोळ उठला असल्याची टीका त्यांनी केली. विद्यमान शासन मराठीला विरोध करू शकणार नाही, पण ज्या प्रकारे नवीन शैक्षणिक धोरण राबवले जात आहे त्यामुळे गदारोळ उठला असल्याचे म्हणाले. राज्यकर्त्यांना >> पान २

## रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह पुणे घाट, सातारा घाट परिसरात पुढील २४ तासासाठी ऑरेंज अलर्ट

### कोकण किनारपट्टीला ३.५ ते ४.५ मीटर उंच लाटांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह पुणे घाट, सातारा घाट परिसरात पुढील २४ तासासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर कोकण किनारपट्टीला भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (आय.एन.सी.ओ.आय.एस.) तर्फे २६ जून २०२५ रोजीचे ५.३० पासून ते २८ जून २०२५ रोजी ११.३० पर्यंत ३.५ ते ४.५ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या



सूचना देण्यात आल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळविले आहे.

राज्यात मागील २४ तासांमध्ये (२७ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) वाशिम जिल्ह्यात ५२.८ मिमी पाऊस झाला आहे. तर बुलढाणा जिल्ह्यात ४४.८, वर्धा जिल्ह्यात ३९.२ मिमी, जळगाव २८.२, आणि रायगड जिल्ह्यात २६.७ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज २७ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- ठाणे १६.४, रायगड २६.७, रत्नागिरी १२.८, सिंधुदुर्ग १३.६, पालघर १९.३, नाशिक ८.२, धुळे १०.५, नंदुरबार २, जळगाव २८.२, अहिल्यानगर १.२, पुणे ८.६, सातारा ४, सांगली १.७, कोल्हापूर ८.९, छत्रपती >> पान २

## 'उद्धव सरकारनेच त्रिभाषा सक्तीचा निर्णय घेतला'

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील शाळांमध्ये त्रिभाषा सक्तीचा निर्णय उद्धव सरकारनेच २७ जानेवारी २०२२ रोजी घेतला होता. डॉ. रघुनाथ माशेलकर समितीने पहिली ते बारावीपर्यत मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषांचे शिक्षण अनिवार्य करण्याची शिफारस केली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील राज्य मंत्रिमंडळाने या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. हा गौप्यस्फोट महाराष्ट्र शासनाचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केला. फडणवीस सरकारने विचारपूर्वक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने सुधारित त्रिभाषा सुत्राला मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार पहिलीपासून मराठी आणि इंग्रजी या दोन भाषा सक्तीच्या करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना तिसरी भाषा म्हणून कोणतीही एक भारतीय भाषा शिकण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उद्धव सरकारच्या निर्णयाच्या तुलनेत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने घेतलेला निर्णय विद्यार्थी हिताचा आहे.

## बालिकेवर सामूहिक बलात्कार प्रकरण; न्यायालयाने ५ नराधमांना ठोठावली जन्मठेप

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** बालिकेवर सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी न्यायालयानं ५ नराधमांना जन्मठेप ठोठावली आहे. ही घटना साक्री तालुक्यातील एका पाड्यावर घडली होती. या प्रकरणी धुळ्याच्या विशेष सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती वाय जी देशमुख यांनी पाचही नराधमांना दोषी ठरवून जन्मठेप आणि प्रत्येकी दहा हजाराचा दंड भरण्याची शिक्षा ठोठावली आहे. किशोर पंडीत सुर्यवंशी, छोटू उर्फ प्रशांत रतीलाल बागुल, चेतन भटू बागुल, संदेश रामदास साबळे आणि जयेश सुर्यवंशी अशी बालिकेवर सामूहिक बलात्कार करणाऱ्या नराधमांची नावे आहेत.

या घटनेची अधिक माहिती अशी की, पीडित बालिका शेतात असलेल्या झोपडी वजा घरात आजी आणि लहान भावांसोबत वास्तव्यास होती. मध्यरात्री बालिका लघुशंकेसाठी घराबाहेर आली. यावेळी शेतालगत दबा धरून किशोर पंडीत सुर्यवंशी, छोटू उर्फ प्रशांत रतीलाल बागुल, चेतन भटू बागुल, संदेश रामदास साबळे आणि जयेश सुर्यवंशी या पाच नराधमांनी बालिकेवर ३ जून २०२३ रोजी सामूहिक बलात्कार केला. याप्रकरणी पीडितेच्या आजीनं ४ जून २०२३ रोजी तक्रार दिल्यावरून पाचही संशयितांविरुद्ध साक्री पोलीस ठाण्यात बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह अन्य कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक रोशन व्ही. निकम यांच्याकडं सोपवण्यात आला होता. त्यांनी सर्व आरोपींना अटक करुन गुन्ह्यात वापरलेलं साहित्य जप्त केलं. त्यांनी घटनेचा सखोल तपास करत कागदपत्रांची पूर्तता करून सर्व आरोपी विरूद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

या खटल्याची सुनावणी इथल्या विशेष सत्र न्यायाधीश श्रीमती वाय. जी. देशमुख यांच्यासमोर झाली. आरोपी जयेश सुर्यवंशी वगळता इतर सर्व आरोपी हे न्यायबंदी होते. त्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील निलेश कलाल यांनी युक्तिवाद केला.

## शरद पवार मोदींना इस्रायलला घेऊन गेले होते; स्वत: सांगितला प्रसंग!

**मुंबई/प्रतिनिधी :** इराण-इस्रायल युद्धाबाबत अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थीचा दावा केल्यानंतर मोठी चर्चा सुरू झाली आहे. भारत व पाकिस्तान यांच्यातील संघर्षातही डोनाल्ड ट्रम्प यांनी अशाच प्रकारे मध्यस्थीचा दावा केला होता. या पार्श्र्वभूमीवर मोदी सरकारने या प्रकरणात डोनाल्ड ट्रम्प यांच्या सांगण्यानुसारच भूमिका घेतल्याची टीका विरोधकांकडून केली जात आहे. तसेच, शरद पवारच पंतप्रधान नरेंद्र मोदींना इस्रायलला घेऊन गेल होते, असाही दावा केला जात असताना त्यावर खुद्द शरद पवारांनीच उत्तर दिलं आहे.

# युद्धात भाग घेऊनही अमेरिका इराणला २.५ लाख कोटी रुपये देण्यास तयार

**तेहराण : अमेरिका इराणला त्याचा नागरी ऊर्जा उत्पादन अणु कार्यक्रम विकसित करण्यास मदत करण्याचा विचार करत आहे. सीएनएनच्या वृत्तानुसार, अमेरिकेने इराणला ३० अब्ज डॉलर्स (सुमारे २.५ लाख कोटी रूपये) गुंतवणूक प्रस्तावित केली आहे, ज्याअंतर्गत इराण युरेनियम समृद्ध न करता नागरी ऊर्जेसाठी अणु कार्यक्रम सुरू करू शकतो. या करारानुसार, इराणला काही निर्बंधांमधून सूट देखील मिळू शकते आणि परदेशी बँकांमध्ये जमा केलेल्या ६ अब्ज डॉलर्सपर्यंतच्या रकमेची उपलब्धता मिळू शकते, ज्यावर सध्या बंदी आहे.**

### अनेक निर्बंधांमध्येही सवलत देणार!

नागरी ऊर्जा उत्पादन अणुकार्यक्रम हा एक अणुकार्यक्रम आहे जो केवळ वीज किंवा ऊर्जा निर्मितीसाठी वापरला जातो, शस्त्रे बनवण्यासाठी नाही. यामध्ये, अणुऊर्जा प्रकल्प बांधले जातात जे अणु अभिक्रियांचा वापर करून वीज निर्माण करतात. त्याचा लष्करी उद्देशांशी किंवा शस्त्रांशी संबंध नाही. अमेरिका आणि



इराणमधील शांतता चर्चा सुरू करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून या हालचालीचे वर्णन केले जात आहे. २० जून रोजी अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ आणि आखाती देशांच्या नेत्यांमध्ये व्हाईट हाऊसमध्ये एक गुप्त बैठक झाली. त्यात या प्रस्तावावर चर्चा झाली. अमेरिका म्हणते की ते या कार्यक्रमासाठी थेट पैसे देणार नाही, परंतु इतर आखाती देश त्यात गुंतवणूक करतील अशी आशा आहे.

दुसरीकडे, इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी गुरुवारी सांगितले की इस्रायल इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांना मारू इच्छित होते. काट्झ यांनी चॅनल १३ ला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे की, 'जर खमेनी आमच्या आवाक्यात असते तर आम्ही त्यांना मारले असते.' काट्झ म्हणाले की, 'इस्रायल खमेनींना मारू इच्छित होता, परंतु तसे करण्याची संधी नव्हती.' इस्रायलने अमेरिकेकडून परवानगी घेतली आहे का असे विचारले असता काट्झ यांनी उत्तर दिले की, 'या गोष्टींसाठी आम्हाला कोणाच्या परवानगीची आवश्यकता नाही.'

CMYK

# आभाळ फाटलं : शेतकऱ्यांच्या स्वप्नावर घाला; तालुक्यातील ४८ हजार ४०६ शेतकऱ्यांना फटका

## कांचनगंगा नदीचे खोलीकरण करा शेतकऱ्यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** गत वर्षाची मरगळ झटकून नव्या दमाने, नव्या आशेने शेतकर्यांनी खरीपाच्या पेरणीची तयारी केली. तालुक्यात जवळपास हजारो हेक्टरवर पेरणी केली. पेरणी केलेले अंकूर जमिनीवर डोकावर असताना व खोळबलेल्या पेरणीसाठी आभाळाकडे डोळेलावून बसलेल्या शेतकर्यांवर नैसर्गिक संकट कोसळले आहे. बुधवारी रात्री व गुरुवारी दिवसभर झालेल्या मुसळधार पावसाने तालुक्यातील सोयाबीन,मूंग, उडीद, तूर, हळद,भाजीपाला अशा तब्बल ३९ हजार १७१ हेक्टरवरील पिके बाधित झाली असून ४८ हजार ४०६ शेतकर्यांना नैसर्गिक आपत्तीचा फटका बसल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यामध्ये वाढ होण्याची शक्यता असून संपूर्ण तालुक्यात दुबार पेरणीचे संकट शेतकर्यांवर आले आहे. तालुक्यात २५ व २६ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसाने सर्वत्र पाणीच पाणी झाले असून हाहाकार माजला आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर, हजारो हेक्टर जमीन खरडून गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मेहकर, डोणगाव, लोणी गवळी मंडळा मधे सर्वाधिक पाऊस झाला आहे. एकीकडे पावसाची आतुरतेने वाट पाहली जात असतांना तालुक्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजला आहे. २५ व २६ जून असे दोन दिवस सलग १८ ते १९ तास पाऊस पडला. ज्यात पेरलेल्या पिकाचे नुकसान झाले. तर, कित्येक ठिकाणी जमिनी खरडून गेल्या त्याला पाहता आधीच डबघाईस आलेला शेतकरी आणखीनच हवालदिल झाला आहे. मेहकर तालुक्यात २५ व २६ जून झालेल्या पावसात मेहकर मंडळात ९३ मिमी व १८३ मिमी, जानेफळ मंडळात ७२ मिमी, १२९ मिमी, हिवरा आश्रम मंडळात ६६.५ मिमी, १७५ मिमी, शेलगाव दे.मंडळात ११७ मिमी, १२९ मिमी, डोणगाव मंडळात ९३ मिमी, १८३ मिमी, वरवंट मंडळात ९२.५ मिमी, १३४.३,लोणी गवळी मंडळात ८२.५ मिमी, १४७.५ मिमी, अंजनी बु. मंडळात ९३ मिमी १८३.५, नायगाव मंडळात ९२.५ मिमी, १३४.३ मिमी, कल्याना मंडळात ७१.५ मिमी, ६६ मिमी अशा प्रकारे सर्वच मंडळात अतिवृष्टी झाली आहे. मेहकर तालुक्यातील १६१ गावातील पिकांचे नुकसान झाले असून यामध्ये मुंगाचे १२० हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून ३४० शेतकर्यांना फटका बसला आहे. उडीदाचे १४० हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून ३६० शेतकर्यांना फटका बसला आहे.तूर पिकाचे ३३४१ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून १५२१ शेतकर्याना फटका बसला आहे. २८४० हेक्टरवरील सोयाबीन पिकाचे क्षेत्र बाधित झाले असून याचा ३४ हजार १२० शेतकर्यांना फटका बसला आहे. तर ६३६० हेक्टर जमिन खरडून गेली असून यामुळे ७६६० शेतकर्यांचे नुकसान झाले आहे. तालुक्यातील ऐकूण ३९ हजार १७१ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून ४८ हजार ४०६ शेतकर्यांची नुकसान झाली असल्याची प्राथमिक माहिती असून नुकसानीचे आकडेवारीत वाढ होण्याची शक्यता आहे. मुसळधार पावसाने तालुक्यातील शेतकर्यांवर दुबार पेरणीचे संकट आले आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.





### कांचनगंगा नदीचे खोलीकरण करा

डोणगाव परिसरातील सर्वात मोठी नदी म्हणून कांचनगंगा नदीची ओळख आहे. मात्र, कित्येक वर्षांपासून कांचनगंगा नदीचे खोलीकरण करण्यात न आल्याने नदीचे पात्र गाळाणे भरले आहे. त्यामुळे पात्र उथळ झाले आहे. त्यामुळे पूर येताच परिसरातील शेतकर्यांच्या शेतात पाणी शिरून मोठे नुकसान होते. त्यामुळे कांचनगंगा नदीचे खोलीकरण करावे, अशी मागणी शेतकऱ्यांसह विलास काळे शेतकरी डोणगाव यांनी केले आहे

### कांचनगंगा नदी पात्राचे खोलीकरण व रुंदीकरण आवश्यक

भारतीय जैन संघटनेने गत काही वर्षाअगोदर गाळयुक्त शिवार व गाळमुक्त धरण ही संकल्पना राबविली होती. त्याचा मोठा सकारात्मक परिणाम झाला होता.मात्र कांचनगंगा नदीपात्राचे खोलीकरण व रुंदीकरण झाले नाही.आता ही नदी पूर्णत: गाळाने भरली असून या नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करणे गरजेचे झाले आहे.शासनाने सदर नदीचे खोलीकरण करण्यासाठी इंधन उपलब्ध करून दिल्यास शेतकर्यांना नदीपात्रातील गाळ शेतात टाकण्यासाठी मोठी मदत होणार आहे. तसेच डोणगावमध्ये निर्माण झालेल्या पाणीटंचाईही निवारण्यास मदत होणार आहे. अंजनी येथून सुरू झालेल्या या नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी शासनाने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. अशी प्रतिक्रिया सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी प्रमोदसिंह दुबे यांनी दिली.

## आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज १०४ वि जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत कॉंग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

## आषाढी वारीनिमित्त विठुरायाचे आजपासून २४ तास दर्शन सुरू

**पंढरपूर:** पंढरपूरची वारी हा महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव असतो. या वारीत लाखोंच्या संख्येने वारकरी सहभागी होऊन विठ्ठल माउलींच्या नामाचा गजर करत त्यांच्या भक्तीत लीन होताना दिसतात. वर्षातून एकदा येणारी ही आषाढी वारी यावर्षी ६ जुलै रोजी आली आहे. त्यामुळे विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागू लागल्या आहे. त्या दृष्टीने विठ्ठल मंदिर समितीचे नियोजन देखील झाले आहे. विठ्ठल भक्तांना आणि वारकऱ्यांना चांगले दर्शन घेता यावे यासाठी मंदिर आता २४ तास सुरु ठेवण्यात येणार आहे.

अवघ्या दहा दिवसांवर आलेल्या आषाढी एकादशी निमित्त, वारकऱ्यांची आणि भाविकांची पंढरपूर मंदिरात होणारी मोठी गर्दी लक्षात घेता, श्री विठ्ठल रुक्मिणीमातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२.१५ तास पदस्पर्श दर्शन आजपासून (दि.२७) सुरू करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

# सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आ. मनोज कायंदे शेतकऱ्याच्या बांधावर



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे यांनी नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी यावेळी बिबी, पिंपरी खंदारे, ब्राह्मण चिकना , खळेगांव, महारचिकना, देऊळगाव कोळ,कुंबेफळ खापरखेड,सह अतिवृष्टी गावांना आज भेटी देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची व्यथा जाणून घेत नुकसान झालेल्या पिकांच्या व खरडुन गेलेल्या जमिनीचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना दिले.

यावेळी अनेक शेतकऱ्यांनी आमदार मनोज कायंदे यांना कशाप्रकारे ढगफुटी सदृश्य पाऊस पडला याबाबत माहिती दिली खळेगाव, देऊळगाव कोळ येथील समृद्धी महामार्गावरील पाणी शेतकऱ्यांच्या शेतात गेल्याने खुप नुकसान झाले त्यासंबंधीत अधिकार्यांना तात्काळ पाणी निचरा होण्यासाठी तात्काळ व्यवस्था करा म्हणून सुचना दिल्या.

यावेळी नितीन कायंदे, सदाशिव मुंडे, अरविंद चव्हाण,माजी सभापती सुनील केंद्रे ,देवानंद सानप, विठ्ठल आटोळे, अंबादास खंड, सरपंच परमेश्वर खंदारे, सरपंच मधुकर सानप, सरपंच अशोक कायंदे, सरपंच प्रकाश चौधर, सरपंच संदीप गायकवाड, सरपंच शिवाजी ढाकणे, सरपंच गणेश काकड,भुजंगराव वायाळ, राजेंद्र कांगणे,दिनकर फड, रामेश्वर काळुशे, गोपाल काबरा, प्रविण धाईत, गणेश फड विष्णू गायकवाड,कांता सानप,विलास अवसरमोल सह उपविभागीय संजय खडसे, तहसीलदार भुषण पाटील तहसीलदार,अजित दीवटे, बिबी पोलिस स्टेशन चे संदीप पाटील तालुका कृषी अधिकारी गटविकास अधिकारी अंकुश म्हस्के मंडळ अधिकारी सर्व गावचे तलाठी कृषी सहाय्यक सरपंच , ग्रामविकास अधिकारी सह शेकडो शेतकरी उपस्थित होते. आमदार प्रत्यक्ष बांधावर अधिकाऱ्यांसह हजर झाल्याने अधिकाऱ्यांची मात्र तारांबळ उडाली चिखल तुडवत जावे लागले पण याप्रसंगी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दुःखद प्रसंगी समाधान दिसून आले

पान १ वरून...

### हिंदी सक्तीवरुन भाजपमध्ये

शकतात त्यामुळे हिंदी सक्ती नको, अशी भूमिका शाळा प्रशासनाने घेतली आहे. राज ठाकरे यांनी घेतलेला निर्णय आम्हाला मान्य आहे. म्हणून आमच्या शाळेने पाठिंबा दिला आहे. आमच्या शाळेत केजीपासूनचे वर्ग आहेत. आम्हाला अंदाज आहे की मुलांना शिकताना किती अडचणी येतात. त्यातच त्यांना आणखी एका भाषेची सक्ती अडचणीची ठरू शकेल, अशी प्रतिक्रिया या शाळेतील शिक्षकांनी व्यक्त केली. शाळेच्या या भूमिकेला मनसेकडून पाठिंबा देण्यात आला आहे. सरकारने शाळांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या पाठीशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना आहे, हे लक्षात ठेवावे. दोन्ही भाऊ एकत्र आले आनंद आहे. आपण आता पाहू शकाल मराठी माणसाच्या हितासाठी ५ तारखेला भव्य दिव्य मोर्चा आपल्याला पाहिला मिळेल, असे मनसेने म्हटले आहे. हा मोर्चा भूतो न भविष्यती असा मोर्चा असेल, भाषेसाठी निघणारा हा मोर्चा असेल, आता मोर्चा होईल बाकी, पुढच्या ज्या घटना आहेत त्यावर राज साहेब आणि उद्धव साहेब बोलतील. शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे बोलण्यासाठी काही नव्हते, ते काल भाजपचा एजेंडा ते घेऊन आले होते. राज ठाकरे यांच्या प्रश्नांना त्यांच्याकडे उत्तरे नव्हती, त्याच गोष्टी ते रिपीट करत होते, राज ठाकरेंकडे येताना थोडा अभ्यास करून यायला हवे होते. अनेकांची इच्छा होती, हिंदी सक्तीच्या विरोधात अनेक कलाकार, लेखक, साहित्यिक एकत्र येणार आहेत. मला कालपासून फोन सुरू झाले आहेत, इतर पक्ष देखील येतील, त्या सर्वांची एक बैठक आम्ही घेऊ आणि मोर्चा संदर्भात दिशा ठरवू. ठाण्यात २९ किंवा ३० तारखेला एक बैठक होईल त्यात सर्व पक्ष आणि कलाकार यांची बैठक ठेऊ, असे मनसे नेते अविनाश जाधव यांनी सांगितले.

### प्लास्टर ऑफ पॅरिसच्या

करताना पर्यावरणस्नेही सामुग्रीचा वापर व नैसर्गिक रंगाचा वापर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सव प्रथा परंपरेनुसार साजरा व्हावा. उंच व मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी पर्यावरणपूरक मार्ग काढण्यात यावा. तसेच छोट्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यात यावे. शाडूच्या व पर्यावरणपूरक सामग्रीचा वापर करून मूर्ती बनविण्यासंदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे. डॉ. काकोडकर यांनी जल प्रदुषणाचा विचार करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्यावर भर देण्यात यावा. रासायनिक रंगांमुळे जास्त प्रदुषण होते. त्यामुळे नैसर्गिक रंगाचा वापर करणे, पर्यावरणपूरक साहित्य वापरणे यावर भर देऊन जनजागृती करण्यासंदर्भात त्यांनी सूचित केले, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### मराठीवर अन्याय होता

एकच भाषा ठेवायची आहे ती म्हणजे हिंदी. हे मुळात चुकीचे धोरण आहे. तीन भाषेचा धोरण आपण पूर्वीपासून स्वीकारले आहे, त्यामुळे हिंदी सक्ती चुकीची असल्याचे त्यांनी सांगितले. एकीकडं शिक्षक नाहीत, पुस्तके नाहीत असं असताना भाषा वाढवण्याचा आग्रह धरला जात असल्याचे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, सर्वांनी मोर्चात सहभागी व्हावे ही राज ठाकरे यांची पॉलिटिकल क्शन आहे. कसा मोर्चा काढायचा हा त्यांचा भाग आहे, पण मराठीवर अन्याय होता कामा नये ही आमची भावना आहे. ती कशाप्रकारे मांडायचे हे आम्ही ठरवू. मोर्चामुळे ते (राज आणि उद्धव) एकत्र येत आहेत असं काही नाही. ही चर्चा गेल्या अनेक महिन्यापासून सुरू आहे. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक डोळ्यासमोर त्यांची ही चर्चा सुरू आहे. दोघांची संख्या वाढेल या दृष्टीने त्यांची चर्चा आहे.. घरातील वाद, भांडण मिटत असतील तर ही आनंदाची बाब आहे, पण आमची महाविकास आघाडी आहे त्याचे घटक पक्ष उद्धव ठाकरे आहेत. त्यांनी कोणाबरोबर युती करावी हा त्यांचा भाग आहे.

### रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह

संभाजीनगर १७.४, जालना १५.२, बीड १.६, लातूर १.२, धाराशिव ०.४, नांदेड ३, परभणी ९.१, हिंगोली १४.८, बुलढाणा ४४.८, अकोला ११.९, वाशिम ५२.८, अमरावती १४.८, यवतमाळ १९.७, वर्धा ३९.२, नागपूर ११.२, गोंदिया ०.२, चंद्रपूर ८.२ आणि गडचिरोली जिल्ह्यात १२.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कांचनगंगा नदीच्या पुरामुळे गावात शिरले पाणी; जलजीवन विस्कळीत

## पुराच्या पाण्यात अडकलेल्या पाच नागरिकांचा सुरक्षित रेस्क्यू





दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** परिसरात २६ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसाने येथील कांचनगंगा दीसह परिसरातील अनेक नदी नाले तुडुंब भरून वाहले. कांचनगंगाला आलेल्या पुरात येथील पाच जण अडकून पडले होते. सदर नागरिकांनी आपला जीव वाचवण्यासाठी एका निंबाच्या झाडावर जाऊन आश्रय घेतला होता. या घटनेबाबत महसूल विभागाला माहिती मिळताच त्यांनी एनडीआरएफ पथकाला याबाबत माहिती दिली. मात्र, पथक पोहोचण्यापूर्वीच महसूल विभागाच्या टीमने पाचही नागरिकांना निंबावरून सुरक्षित खाली उतरवून त्यांच्या जीव वाचवला. तब्बल १८ ते २० तासापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने डोणगाव परिसरासह सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. पहिल्याच पावसाने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले.





### कांचन गंगा नदीला आलेल्या पुरामुळे वाहतूक प्रभावित

येथील कांचनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे महामार्गावरील वाहतूक प्रभावित झाली होती. तब्बल आठ ते दहा तासाच्या वर वाहतूक खोळंबल्याने रस्त्यावर तब्बल अर्धा ते एक किलोमीटरच्या वर वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर व कांचनगंगा नदीचे पाणी ओसरल्यानंतर उशिरा या मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. कांचनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे वाहनधारकांना मोठा फटका बसला असून परिसरातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. पहिल्याच पावसात सर्वत्र पाणीच पाणी झाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल झाले. त्याचबरोबर प्रशासनाची मोठी दमछाक झाली.

डोणगाव परिसरातील शेत शिवारात गोविंदराव रामभाऊ परमाळे, कुलदीप गोविंदराव परमाळे, आकाश अनिल परमाळे,अनिल लक्ष्मण परमाळे व ज्ञानेश्वर लक्ष्मण कावले हे डोणगाव येथील वरील पाच जण डोणगाव शेलगाव रोड लगत असलेल्या शेतात गुरांची चारापाणी करण्यासाठी गेले होते. दरम्यान काच नदीला आलेल्या पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या पाचही युवकांनी आपला जीव वाचवण्यासाठी काठावर असलेल्या लिंबाच्या झाडावर चढून बसले होते. सदर घटनेची माहिती मिळताच डोणगाव महसूल विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पाचही युवकांना नदीच्या पाण्याचा प्रवाह कमी होताच सुरक्षित खाली उतरून त्यांचा जीव वाचविला. त्याचबरोबर शेलगाव परिसरात दोन ते तीन घरांमध्ये पाणी शिरले होते, तेथील लोकांना सुद्धा सुरक्षित स्थळी घालण्यात आले. नायब तहसीलदार पवन देशमुख, ठाणेदार अमरनाथ नागरे. मंडळ अधिकारी. अमोल राठोड तलाठी.अनूप नरोटे तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन सदर नागरिकांचा जीव वाचविण्यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर शहरातील ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आलेली नाली बंद असल्याने एका तळ्यातील परिसरात असलेल्या नागरिकांच्या घरात पर्यंत पाणी पोहोचले होते. त्या नागरिकांना सुद्धा सुरक्षित स्थळी हलवून त्यांची उर्दू शाळेत राहण्याची व्यवस्था केली. याबाबत शाळेमध्ये हलविण्यात आले अशी माहिती मंडळ विभागाच्या कर्मचाऱ्यांनी माहिती दिली.

# ढगफुटी सदृश्य पावसाने शेती पिकासह शेतीचे अतोनात नुकसान



## नदीकाठच्या जमिनी गेल्या खरडून

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे

**महारचिकना :** महार चिकना फाट्यापासुन हाकेच्या अंतरावर असलेल्या जांभळीच्या नाल्यावर पुराचे पाणी असल्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक एक तास बंद होती. प्रवाशांमध्ये तारांबळ तसेच महारचिकनाहुन मलकापूर पांग्रा कडे जानार्या रोडची वाहतुक तब्बल चार तास बंद लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळातील महार चिकना,खळेगाव खापरखेड,सोमठाणा, कारेगाव तसेच परीसरातील ईतरही गावात दिनांक २६जुन रोजी रात्रीपासुन ढगफुटी सदृश्य पाऊस रात्रभर आणि दिवसभर पडल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले तसेच नदीकाठी असलेल्या जमिनी पिकासाहित खरडून गेल्या अगोदरच मोला महागाच खत बियाणं घेऊन दुबार पेरणी करून शेती खरडुन गेल्यामुळे शेतकरी खूप मोठ्या संकटात सापडला आहे तरी शासनाने खरडलेल्या जमिनीचे पंचनामे करून त्वरित मदत द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहे

# कत्तलीसाठी गुरांची क्रुरपणे वाहतूक; आरोपीविरुद्ध गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव /प्रतिनिधी :** कत्तलीसाठी गुरांची वाहतूक करणार्या वाहनावर पोलीसांनी कारवाई करून गुरांची सुटका करीत आरोपीविरुद्ध प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनयम १९६० सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ कलम ५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला. तसेच वाहनासह १ लाख ९० हजाराचा मुद्देमाल २५ जून रोजी दुपारी ३ वाजताच्यादरम्यान जप्त करण्यात आला. सदर घटनेबाबत कृष्णा रमेश बकाल डोणगाव ता. मेहकर यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, पोलीस स्टेशन अंतर्गत येणार्या डोणगाव येयांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, पोलीस स्टेशन अंतर्गत येणार्या आरेगाव येथून दुपारी एम.एच.४३ बी.बी.१६५५ क्रमांकाच्या टाटा पिकपमध्ये क्रुरपणे गुरांची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. सदर माहितीवरून डोणगाव पोलीस स्टेशनचे पीएसआय संदीप साळवे यांनी

### वाहनासह १ लाख ९० हजाराचा मुद्देमाल जप्त

सदर टाटा पिकअपची पाहणी केली असता चार जनावरे मिळून आली. सदर गुरे हे अत्यंत क्रुरपणे दोराने तसेच दाटिवाटिने बांधुन गाडीमध्ये टाकून वाहतूक केली जात असल्याचे दिसून आले. पोलीसांनी एम.एच. ४३ बी.बी. १६५५ क्रमांकाचा १ लाख ५० हजार रुपयांचा टाटा पिकअप व ४० हजार रुपये किंमतीचे गुरे असा एकूण १ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करणयात आला. सदर जनावरे कतलीसाठी घेवुन जात असल्याचा संशय आहे.आरोपीकडे सदर जनावराचे दाखले व वैदकीय अधिकारी प्रमाणपत्र तसेच वाहतूक प्रमाणपत्राबाबत विचारना केली असता त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे कागदपत्र मिळून आली नाही. अशा तक्रारीवरून पोलीसांनी आरोपी अनिल नारायण गवई वय २५, विठ्ठल किसन वाळले सर्व रा. आरेगाव ता मेहकर जि.बुलढाणा याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.



### बजरंग दलाच्या कार्यकर्त्यामुळे वाचले गुरांचे प्राण

डोणगाव पोलीस स्टेशन हद्दीतील आरेगाव येथून चार गुरांची कत्तलीसाठी वाहतूक होत असल्याची माहिती बजरंग दलाच्या कार्यकऱ्त्यांना मिळाली, सदर माहितीवरून बजरंग दलाच्या कार्यकऱ्त्यांनी पोलीसांच्या मदतीने सदर गुरे कत्तलीसाठी घाहिती बजरंग दलाच्या कार्यकऱ्त्यांना मिळाली१ सदर माहितीवरून बजरंग दलाच्या कार्यकऱ्त्यांनी पोलीसांच्या मदतीने सदर गुरे कत्तलीसाठी घेउन जाणाऱ्या आरोपीला गुरांसह पकडून दिले. त्यामुळे ४ गुरांचे प्राण वाचले आहेत. बजरंग दलाच्या कार्यकऱ्त्यांच्या या धाडसाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# कांटा लगा गर्ल अभिनेत्री शेफाली जरीवाला हिचं ४२ व्या वर्षी निधन; मनोरंजन क्षेत्रात हळहळ



**मुंबई/प्रतिनिधी :** कांटा लगा गर्ल आणि बिग बॉस १३ मधील स्पर्धक शेफाली जरीवाला (४२) हिचं हृदयविकाराचा झटक्यानं निधन ( ) झालं आहे. शेफालीची प्रकृती खालावल्यानंतर तिचे पती पराग त्यांनी यांनी तिला कूपर रुग्णालयात नेले. परंतु रुग्णालयातील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. शेफालीच्या मृत्यू संपूर्ण मनोरंजन क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

२००२ मध्ये कांटा लगा या अल्बममधील गाणे रिलीज झाले आणि ते रिलीज होताच सर्वांच्या पसंतीस उतरले. या गाण्यात शेफाली जरीवालाचा बोल्ड लूक पाहायला मिळाला होता. या गाण्यामुळे शेफाली जरीवालाला चांगली प्रसिद्धी देखील मिळाली होती.

# सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आ. मनोजभाऊ कायंदे शेतकऱ्याच्या बांधावर

दैनिक आपला विदर्भ

**महार चिकना/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसुल मंडळातील व परीसरातील गावांची सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कांयदे यांनी नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ सर्वे करण्याचे आदेश दिले खापरखेडा येथील शेतकरी केशव सवाई राठोड यांची सोमठाणा शिवारातील विहीर खचुन नुकसान झाले तसेच महारचिकना येथील दिपक घुगे यांची विहीर खचली याचा सर्वे करण्याचा आदेश दिला खळेगाव येथील समृद्धी महामार्गावरील पाणी शेतकऱ्यांच्या शेतात गेल्याने खुप नुकसान झाले त्यासंबंधीत अधिकार्यांना तात्काळ पाण्याची





व्यवस्था करा म्हणून सांगीतले आज दिनांक जुन रोजी आमदार महोदय यांनी पाहणी केली त्यांचे सोबत बळीवंशचे नितीन कायंदे, अरविंद चव्हाण,माजी सभापती सुनिल केंद्रे यांचेसह लोणारचे तहसीलदार भूषण पाटील तालुका कृषी अधिकारी दिघे साहेब, बिबीचे ठाणेदार संदिप पाटील, सर्व गावचे तलाठी कृषी सहायक सरपंच , ग्रामसेवक यांना घेऊन पिंपरी खंदारे, ब्राह्मण चिकना, खापरखेडा, महार चिकना, खळेगाव कोनाटी कुबेभळ सह अनेक नुकसान ग्रस्त गावांची पीक नुकसानीची तसेच जमिनी खरडल्याची पाहणी केली यावेळी शेकडो शेतकरी उपस्थित होते

**आमदार मनोज कायंदे घेतली बांधावर न्याहारी......!**

आपल्या अतिशय साधी राहणे आणि जनसामान्यांमध्ये मिळून मिसळून राहण्याच्या स्वभावामुळे चर्चेत असणारे सिंदखेडराजा मतदारसंघाचे आमदार मनोज भाऊ कायंदे हे वेगवेगळ्या सामान्य घटनेने चर्चेत असतात. २७ जून वार शुक्रवार अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन नुकसानीच्या सर्वे करत असताना त्यांनी अनेक गावांना भेटी दिल्या शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या अधिकाऱ्यांशी तात्काळ संवाद साधून समस्या सोडविण्याचे आदेश दिले सरसकट नुकसान भरपाई कशी मिळेल यासाठी वरच्या स्तरावर बोलणे केले हे सगळं सुरू असताना सकाळी आठ वाजेपासून घराच्या बाहेर पडलेले आमदार एक वाजता सहज मजाक मध्ये बोलले मला भूक लागली आहे शेजारी असलेल्या मायमाऊलीने लगेच टोपली मधून पाच-सहा भाकरी काढल्या ठेचा लोणचं आमदार साहेबांच्या हातावर टेकविल्या आमदार साहेब तात्काळ तेथेच बांधावर न्यारीचा आनंद घेतला. आणि तात्काळ पुढील गावाच्या बांधावर जाण्यासाठी पुढे निघाले आमदार साहेबाचा हा साधेपणा बघून सामान्य लोक आवक होत आहे सामान्य चा आमदार अशी प्रतिमा जोपासत आमदार साहेब नक्कीच मतदार संघाचा विकास करतील ही अपेक्षा जनतेमध्ये प्रचंड प्रमाणात बळावली आहे. अधिकाऱ्यांचा ताफा शोभत असल्याने अधिकाऱ्यांची चांगली तारांबळ उडाली आमदार साहेबांसोबत चिखल तुडवत शेतात जावं लागलं मात्र या कृतीमुळे शेवटच्या घटकातला व्यक्तिमत्व सुखावून गेला

# शेतकऱ्यांचा संयम तुटायची वाट पाहू नका, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जावून तुपकरांचा सरकारला इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मायबाप शासनाने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तात्काळ मदत द्यावी, शेतकऱ्यांना नुकसान देण्यास भरपाई देण्यास टाळाटाळ केल्यास आम्ही शांत बसणार नाही. शासनाच्या छाताडावर बसून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देऊ, शासनाने शेतकऱ्यांचा संयम तुटण्याची वाट पाहू नये, अन्यथा आम्हाला शेतकऱ्याच्या हितासाठी मैदानात उतरावे लागेल. असा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी दिला. ते डोणगाव परिसरातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राची पाहणी करण्याकरिता आले असता माध्यमांशी बोलत होते.

## डोणगाव परिसरातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी

मेहकर व लोणार तालुक्यात मुसळधार पावसामुळे अनेक गावात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.२७ जून रोजी रविकांत तुपकरांनी आरेगाव, डोणगाव, गोहगाव दांदडे, पांगरखेड या गावांमध्ये जाऊन नुकसान झालेल्या शेतजमिनी, शेतीपिकांची आणि घरांची पाहणी केली. घरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, जमिनी खरडून गेल्या आहेत. त्याची तात्काळ







नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी रविकांत तुपकर यांनी शासनाकडे केली आहे.यावेळी तुपकरांच्या डोळ्यातही अश्रू पाहायला मिळाले..!डोणगाव मध्ये अनेक घरांमध्ये पाणी घुसले. तर, आरेगाव, गोहगाव दांदडे, पांगरखेड तेली यासह अनेक गावातील शेती वाहून गेली, पिके वाहून गेली, पाईप लाईन स्प्रिंकलर वाहून गेलेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला. या परिसरातील शेतकऱ्यांशी तुपकरांनी चर्चा केली व शेतकऱ्यांना आधार दिला. हिम्मत न हारता परिस्थितीला सामोरे जाऊ व नुकसान भरपाई मिळवण्यासाठी जोरदार प्रयत्न करु असा शब्द दिला.झालेलं नुकसान खूप मोठं आहे. शेतकरी पुन्हा उभा राहण्याच्या स्थितीत नाही. शेती पिकं वाहून गेली आहेत, विहिरी खचल्या आहेत, पाईपलाइन आणि स्प्रिंकलर वाहून गेले आहेत. अनेक ठिकाणी मातीचा थर जाऊन जमिनी उघड्या पडल्या आहेत. दुबार पेरणीचं संकट आहे.सगळीकडे हाहाकार माजलाय.'' अश्या परिस्थितीत सरकारने मदतीचा हात पुढे करून बळीराजाला वाचवले पाहिजे शेतकऱ्यांचा संयम तुटायची वाट पाहू नका अन्यथा आक्रमक भूमिका घेऊ असाही इशारा तुपकरांनी यावेळी प्रशासनाला दिला. तसेच मायबाप शासनाने संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांना नुकसानीची तात्काळ मदत द्यावी, त्याचबरोबर दुबार पेरणीसाठी खते व बियाणे उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी ही यावेळी रविकांत तुपकर यांनी केली.

## विविध वृत्त...

### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव करणार शेतकऱ्यांच्या बांधावर जावुन अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतजमिनीची पाहणी ही केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे २८ जुनला शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन करणार आहेत



२६ जून रोजी बुलढाणा जिल्ह्यातील लोणार आणि मेहकर तालुक्यामध्ये ढगफ ुटी सदृश्य पाऊस झाला या अतिवृष्टीमुळे शेतात पाणी तुंबुन शेतकऱ्यांच्या शेत जमिनी खरडून गेल्या आहेत अनेक शेतकऱ्यांचे नुकसान या अतिवृष्टीमुळे झाले आहे शेतकऱ्यांच्या बंधावर जावुन नुकसानीची पाहणी करण्यासाठी २८ जुनला केंद्रीय मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव हे लोणार आणि मेहकर या अतिवृष्टी ग्रस्त भागांचा दौरा करणार आहेत सकाळी दहा वाजता लोणार तालुक्यातील सुलतानपूर येथून आपल्या दौऱ्याला सुरुवात करणार आहे अंजनी, शारा, वेणी गुंधा, त्यानंतर मेहकर तालुक्यातील अंत्री देशमुख, डोणगाव, गोहेगाव,पांगरखेड,जनुना शेलगाव देशमुख,विश्वी, आणि घाटबोरी या भागात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केद्रीयमंत्री प्रतापराव जाधव शेतकऱ्यांच्या बांधावर जावून करणार आहेत

### रात्रीच्या विचित्र अपघातात एक ठार तर भाजपा शहराध्यक्ष शुभम बनमेरु जखमी



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यात मध्यरात्री भीषण दुर्घटना घडली. मेहकर लोणार रस्त्यावरील वडगाव तेजन जवळ चार चाकी वाहनाने ५ पलट्या घेतल्या..या भीषण अपघातात १ जण जागीच ठार तर तिघे जखमी झाले. मृतक आणि जखमी चौघेही लोणारचे आहेत.. ते मेहकर वरून लोणार कडे जात होते.




ऋषभ बाबुलालजी बगडिया (२६, रा.लोणार) उर्फ बाळा असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. भाजप शहराध्यक्ष शुभम बनमेरू यांच्यासह तिघे जखमी असून त्यांच्यावर मेहकर येथे उपचार सुरू आहे. प्राप्त माहितीनुसार एम एच २८, बी. डब्ल्यू ०९५९ क्रमांकाच्या महिंद्रा कंपनीच्या चार चाकी वाहनाने चौघे मित्र मध्यरात्री साडे अकराच्या सुमारास मेहकर वरून लोणार कडे जात होते. काल दिवसभर मेहकर लोणार तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे शेतजमीन खरडून गेली.. वडगाव तेजन जवळ शेतातील माती खरडून मुख्य रस्त्यावर आलेली होती.. त्या मातीवर चार चाकी वाहन स्लीप झाले, गाडीने चार ते पाच वेळा पलट्या मारल्या..या अपघातात ऋषभ बाबुलालजी बगडिया याचा मृत्यू तर तिघे जखमी झाले. अपघात ग्रस्त युवकांना तातडीने मेहकर येथे हलवण्यात आले.. अपघात एवढा भीषण होता की वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला होता..

दरम्यान एवढा मोठा वर्दळीचा रस्ता असताना आणि काल रात्री एवढा भीषण अपघात झालेला असताना देखील रस्त्यावरच चिखल यंत्रणे कडून दुपार पर्यंत हटवलेला नसल्याने अजून ही याठिकाणी दोन चाकी वाहनांचे लहान मोठे अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे

## संतत धार, पंधरा दिवसांच्या विश्रांती नंतर परतला मान्सून

**रिसोड/प्रतिनिधी :** सायंकाळपासून तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात संततधार सुरू असून पंधरा दिवसापेक्षा जास्त विश्रांती घेतलेला मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे नदी नाले ओसंडून वाहत असल्यामुळे तालुक्यात काही गावांचा संपर्क तुटला आहे.



यावर्षी मे महिन्याच्या उत्तरार्धात मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला होता मान्सून पूर्व मशागतीची कामे करणे ही मुश्किल झाले होते हवामान खात्याचा अंदाज खरा ठरवत मान्सून तब्बल बारा दिवस आधी राज्यात दाखल झाला होता त्यानंतर मान्सून दाखल झाला असला तरी सक्रिय झाला नसल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले होते याकडे दुर्लक्ष करत बऱ्याच शेतकऱ्यांनी हळद लागवड व सोयाबीन सह इतर पिकांची पेरणी केली होती तुरळक ठिकाणी पाऊस पडल्यानंतर पाच जून पासून पावसाने दडी मारली होती कृषी विभाग व हवामान खात्याच्या अंदाजाकडे दुर्लक्ष करत शेतकऱ्यांनी खरीप पेरावे धावून रब्बी पेरावे राहून या म्हणीप्रमाणे पेरण्या केल्या होत्या मध्यंतरी पावसाअभावी काही ठिकाणी या पेरण्या रखडल्या होत्या तर काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले होते परंतु कालपासून पंधरा दिवसापेक्षा अधिक विश्रांती घेतलेला मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून रात्रीपासून पडत असलेल्या संतत धार पावसामुळे कोवळ्या पिकांना जीवदान मिळाले आहे परिणामी शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे २५ जून च्या रात्री पडलेल्या जोरदार पावसामुळे नदी नाले ओसंडून वाहत असून तालुक्यातील काही गावांचा संपर्क तुटला आहे.

### कर्मचाऱ्यांना तडकाफडकी कामावरून काढणे म्हणजे निव्वळ त्रास देण्याचा प्रकार, हायकोर्टाकडून दोन सरकारी कर्मचाऱ्यांना दिलासा

**मुंबई/प्रतिनिधी :** २० वर्षे सरकारी कर्यालयात सेवा देणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयानं मोठा दिलासा दिला आहे. या कामगारांची सेवा कायम करण्याच्या औद्योगिक न्यायालयाच्या आदेशावर हायकोर्टानंही शिक्कामोर्तब केलं आहे.शांता सुतार आणि दत्ताकुमार कांबळे, अशी या दोन कर्मचाऱ्यांची नावं आहेत. सुतार हे सफाई कर्मचारी म्हणून तर कांबळे हे कारकून पदावर कार्यरत होते. कोल्हापूर येथील क्रीडा प्रबोधिनी कार्यालयात हे दोघं वर्ष १९९८ ते २०१७ या कालावधीत कार्यरत होते. मात्र वर्ष २०१७ मध्ये त्यांना कामावरून अचानक काढून टाकण्यात आलं. त्याविरोधात त्यांनी औद्योगिक न्यायालयात धाव घेतली. औद्योगिक न्यायालयाने त्यांना पुन्हा सेवेत घेण्याचे आदेश दिले होते. मात्र राज्याच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागानं या आदेशाला याचिकेद्वारे हायकोर्टात आव्हान दिलं होतं.



## जानेफळसह परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस

### नागरिकांची उडाली तारांबळ

**जानेफळ/प्रतिनिधी :** गुरूवारी सकाळपासून झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने जानेफळसह परिसरातील नागरिकांची एकच तारांबळ उडाली. काही तासांतच प्रचंड पावसामुळे नद्या–नाले दुथडी भरून वाहू लागले असून, काही गावांमध्ये घरामध्ये पाणी शिरले. पावसामुळे स्थानिक वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. अनेक भागांत रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहनांची रांगा लागल्या असून, काही ठिकाणी छोटे पूल व रस्ते पाण्याखाली गेले आहेत. जानेफळ व इतर ही भागातील नाल्यांना पूर आल्याने नदीनाले, रस्ते ओसंडून वाहत होते. त्यामुळे अनेक घरांमध्ये पाणी गेले. पावसामुळे काही कच्च्या घरांचे मोठे नुकसान झाल्याची माहिती आहे. गावातील नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडे तात्काळ मदतीची मागणी केली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही, मात्र शेतीचे मोठे नुकसान झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## बीबी परिसरात अंमली पदार्थ विरोधी दिवस साजरा; सक्षम व सुदृढ समाजासाठी व्यसनमुक्तीची गरज





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** अंमली पदार्थांच्या सेवनाच्या दुष्परिणामांबद्दल जनतेला जागरूक करण्याच्या उद्देशाने जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन २६जून रोजी सर्वत्र साजरा केला जातो. त्याप्रमाणे आज रोजी बीबी पोलीस स्टेशन हद्दीत विद्यार्थ्यांना याबाबत जागृती व्हावी याकरिता बीबी पोलीस स्टेशन चे ठाणेदार संदिप पाटील यांनी सहकार विद्या मंदिर बीबी तसेच शिवाजी विद्यालय किनगाव जट्टू येथे जाऊन विद्यार्थ्यांना अंमली पदार्थ, त्याचे मानवी शारीरिक व मानसिक आरोग्यावरील घातक परिणाम, त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक व गुन्हेगारी समस्या याबाबत माहिती दिली. अंमली पदार्थ्यांचे व इतर सर्वच व्यसनापासून दूर राहणे, कुटुंबातील कोणी याकडे वळत असेल किव्वा आहारी गेला असेल त्याला याच्या वाईट परिणामांची जाणीव करून देणे अशा विविध मुद्द्यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बलशाली राष्ट्रासाठी सक्षम व सुदृढ नागरिक असणं महत्वाचे असून त्याकरिता विद्यार्थी हे देशाचे भविष्य असल्याने त्यांना चांगल्या वाईटची जाणं करून देण्याच्या उद्देशाने आजच्या सारख्या कार्यक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले. तसेच कायद्याची माहिती देण्यात आली व या पदार्थांपासून दूर कसे राहावे, तसेच आपल्या प्रकृतीविषयी गंभीर राहण्याविषयी सावध केले. शैक्षणिक संस्थांबरोबरच इतर सेवाभावी संस्थाही या कामात पुढाकार घेत आहेत. यात आता सामान्य माणसांचाही सहभाग असणे गरजेचे आहे. याबाबत मत व्यक्त करून जागृती करण्यात आली.

## लोणार तालुक्यात पावसाचे थैमान; लोणार तालुक्यातील अनेक मंडळात ढगफुटीचा सदृश्य पाऊस

### नदी काठच्या अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडुन गेल्या

दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यात २५ जुन च्या संध्याकाळपासून रिमझिम पावसाला सुरुवात झाली होती पण २७ जुन च्या सकाळी नऊ वाजल्यापासून पावसाचा जोर वाढला खळेगाव, देऊळगाव कोळ, महारचिकना,कंडारी कोनाटी सोमठाणा ,ब्राह्मण चिकना सह अनेक गावांत नऊ वाजताच्या सुमारास ढगफुटी सदृश्य पाऊस झाला या पावसामुळे खळेगाव च्या पुलावरून पावसाचे पाणी वाहत असल्याने खळेगाव फाटा ते खळेगाव कंडारी,भंडारी जागदरी, शेंदुर्जन,या संपर्क तुटला असुन अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडुन गेल्या





असुन अतोनात नुकसान झाले आहे तालुक्यात पाऊस संततधार सुरू आहे अनेक गावांत पावसाने कहर केला असुन तालुक्यातील भुमराळा वझर आघाव,खंडाळा सह अनेक गावाला या पावसाचा फटका बसला आहे

नागपूर मुंबई नॅशनल हायवे ला पण या पावसाचा फटका बसला लोणार तालुक्यातील सुलतानपूर,भानापुर परिसरात ढगफ ुटी सदृश्य पाऊस पडला त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असुन दहा वाजेपासून सुलतानपूर जवळील भानापुर गावातील नॅशनल हायवेवर पुलावरून पावसाचे पाणी वाहत असल्याने नागपूर मुंबई नॅशनल हायवे वरील वाहतूक चार ते पाच तास ठप्प झाली होती दोन्ही बाजूला दोन किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागलेल्या होत्या प्रवाशांचे व वाहनं धारकांसह विद्यार्थ्यांचे देखील प्रचंड हाल झाले आहे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई तात्काळ करुन तात्काळ आर्थिक मदत शासनाने द्यावी अशी शेतकऱ्यांची मागणी आहे

मुंबई नागपूर नॅशनल हायवेवर सुलतानपूर जवळील भानापुर गावाजवळील पुलावर तब्बल पाच तास वाहतूक ठप्प झाली होती त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण, प्रवासी, वाहनधारक या सर्वांना नाहक त्रास सहन करावा लागला असुन भविष्यात परत वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून संबंधित विभागाने भानापुर गावाजवळील पुलाची उंची वाढवावी जेनकरून परत वाहतूक कोंडी होणार नाही याची काळजी घ्यावी अशी मागणी देवानंद सानप भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष बुलढाणा यांनी केली आहे.